तुमचा भाग्यांक तुमचे भविष्य

पं. किसनलाल शर्मा



* भाग्यांकाविषयीचे संग्राह्य पुस्तक *

तुमचा भाग्यांक
तुमचे भविष्य

■ ■ ■

भाग्यांक कसा काढावा ? भाग्यांक १ ते ९
या व्यक्तींचे स्वभाव व गुणदोष, व्यवसाय, कार्यक्षेत्र, भाग्योदय प्रारंभ,
यशदायक रंग, शुभवार, शुभदिनांक, शुभकाळ, भाग्यकारक व मारक
वर्षे, मैत्री - प्रेमसंबंध - विवाह- व्यापार - भागीदारी, भाग्यकारक रत्न,
भाग्यकारक यंत्र, उपासना इत्यादीविषयक माहितीने परिपूर्ण असे
नाविन्यपूर्ण पुस्तक !

■

लेखक
ज्योतिषभास्कर
पंडित किसनलाल शर्मा

■

अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

: प्रकाशक :

आनंद साने

अंजली पब्लिशिंग हाऊस

१५११ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

■

: द्वितीयावृत्ती :

२६ जानेवारी १९९४

(प्रजासत्ताकदिन)

■

© पुनर्मुद्रणादिक सर्वाधिकार प्रकाशकाधीन

■

: मुखपृष्ठ:

रविमुकुल

■

■

: अक्षरजुळणी / मांडणी :

लक्ष्मीकांत तोष्णीवाल

४ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

■

: मुद्रक :

मा. गो. जोशी

आनंद मुद्रणालय

१५२३ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

मनोगत

आपल्या नशिबात काय आहे, हे जाणून घेण्याची इच्छा - जिज्ञासा सर्वांनाच असते. अंकशास्त्र हे विश्वातील सर्वात प्राचीन भारतीय शास्त्र आहे. यजुर्वेदात अंकशास्त्रातील प्रत्येक अंकाचे महत्त्व व त्याची उपयोगिता सांगितलेली आहे. अंकशास्त्रही मानवाचे भविष्य सांगू शकते, हे या विज्ञानयुगात सिद्ध झालेले आहे. ज्योतिषशास्त्राचा पायाच अंकगणितावर आधारलेला आहे.

जन्मतारीख, जन्मवेळ व जन्मस्थान नक्की माहीत असल्यास जन्मकुंडली तयार करून त्या आधारे भूत, वर्तमान व भविष्याची रूपरेखा पाहता येईल, मार्गदर्शन करता येईल. ज्यांना जन्मतारीखच माहिती नाही त्यांच्या भविष्याचे काय? त्यांचे भविष्य अंकशास्त्रावरून पाहता येते.

या लहानशा पुस्तकात जन्मतारखेवरून फक्त एक अंकी भाग्यांकावरून भाग्यांकाचा स्वामीग्रह, राशी, सत्ताधीश अंक, स्वभाव व गुणदोष, व्यवसाय, कार्यक्षेत्र, भाग्योदयास प्रारंभ, यशदायक रंग, शुभवार, शुभदिनांक, शुभकाळ, भाग्यकारक व मारक वर्षे, मैत्री - प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी, भाग्यकारक रत्न, भाग्यकारक यंत्र, उपासना ही परिपूर्ण माहिती दिली आहे.

या माहितीच्या आधारे १ ते ९ भाग्यांकांच्या व्यक्तींचे जीवन कृतार्थ

होईल अशा आत्मविश्वासानेच हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकाचा उपयोग करून येणारे अनुभव प्रस्तुत लेखकाला कळवावेत म्हणजे अंकशास्त्रावर लिहित असलेल्या दुसऱ्या पुस्तकात आपल्या अनुभवांचा उपयोग करता येईल.

'**अंजली पब्लिशिंग हाऊस**' चे संचालक व माझे स्नेही **श्री. आनंद साने** यांनी तत्परतेने हे पुस्तक प्रकाशित करून वाचकांना उपलब्ध करून दिले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

१७९ इंगळे कॉलनी, - **पंडित किसनलाल शर्मा**

शिवणे पुणे ४११ ०२३

ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासकांना तसेच,
सर्वसामान्यांसाठी अत्यंत उपयुक्त व संग्राह्य ग्रंथ !

अनिष्ट
ग्रहपीडा निवारक
साधना

। लेखक ।
ज्योतिषभास्कर : पं. किसनलाल शर्मा
। मूल्य : रु ५०/- फक्त ।
* प्राप्तीस्थान *
अंजली पब्लिशिंग हाऊस
१५११ सदाशिव पेठ, पेंडसे चाळ, पुणे ४११ ०३०

अंतरंग

भाग्यांक कसा काढावा ?	—	१०
भाग्यांक : १	—	१३
भाग्यांक : २	—	१८
भाग्यांक : ३	—	२२
भाग्यांक : ४	—	२६
भाग्यांक : ५	—	३०
भाग्यांक : ६	—	३५
भाग्यांक : ७	—	४०
भाग्यांक : ८	—	४५
भाग्यांक : ९	—	४९

■ ■ ■

भाग्यांक कसा काढावा ?

भाग्यांक काढण्याची अगदी सोपी पद्धत आहे. समजा तुमची जन्मतारीख १८-२-१९३३ आहे. ही जन्मतारीख पुढील प्रमाणे लिहा -

१+८+२+१+९+३+३=२७. बेरीज सत्तावीस आली. पुन्हा २+७=९ बेरीज आली. ९ हा तुमचा भाग्यांक झाला.

जन्मतारखेच्या एक एक अंकात एक एक अंक मिळवून जी बेरीज येईल त्याची पुन्हा बेरीज करावयाची व एकांक काढायचा. हा एकांक म्हणजेच भाग्यांक खालील उदाहरणे पहा. म्हणजे भाग्यांक कसा काढावयाचा ते चटकन लक्षात येईल.

१) जन्मतारीख ४-८-१९४२ आहे. या जन्मतारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

४+८+१+९+४+२=२८.२+८=१०.१+०=१ भाग्यांक आला.

२) जन्मतारीख १-४-१९६८ आहे. या जन्मतारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

१+४४+१+९+६+८=२९.२+९=११=१+१=२ भाग्यांक आला.

३) जन्मतारीख ३१-३-१९५८ आहे. या जन्मतारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

३+१+१+९+५+८=३०. ३+०=3 भाग्यांक आला.

४) जन्मतारीख १-११-१९७२ या जन्मतारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

१+१+१+१+९+७+२=२२. २+२=४ भाग्यांक आला.

५) जन्मतारीख १०-१-१९६५ या जन्मतारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

१+०+१+१+९+६+५=२३. २+३=५ भाग्यांक आला.

६) जन्मतारीख १-११-१९७४ या जन्मतारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

१+१+१+ +१+९+७+४=२४. २+४४=६ भाग्यांक आला.

७) जन्मतारीख १-१-१९७६ या जन्मतारीखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

१+१+१+०+९+७+६=२५. २+५=७ भाग्यांक आला.

८) जन्मतारीख १३-६-१९७८ या जन्मतारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

१+३+६+१+९+७+८=३५. ३+५=८ भाग्यांक आला.

९) जन्मतारीख १९-१-१९३३ या तारखेचा भाग्यांक काढावयाचा आहे.

१+९+१+१+९+३+३=२७. २+७=९ भाग्यांक आला.

वरील उदाहरणांवरून भाग्यांक १ ते ९ कसे काढायचे ते आता

वाचकांच्या लक्षात आले असेलच. मुख्य गोष्ट म्हणजे एक अंकी संख्या येईपर्यंत बेरीज करावयाची हे लक्षात ठेवावे. आणखी एक महत्त्वाची गोष्ट भाग्यांक काढताना लक्षात ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तारीख रात्री १२ नंतर बदलते. तुमचा जन्म जर रात्री १२ नंतर झाला असेल तर त्या दिवशी रात्री १२ नंतर बदलणारी जन्मतारीख घेऊन त्या तारखेचा भाग्यांक काढावा. रात्रौ १२ नंतरचा जन्म असेल आणि तुम्ही जर त्या दिवसाचीच (रात्री १२ पूर्वीची) तारीख घेतलीत तर तुमचा भाग्यांक बदलेल आणि तुमचे भविष्य चुकेल.

■ ■ ■

ज्योतिषशास्त्राच्या अभ्यासकांना व सर्वसामान्यांसाठी
अत्यंत उपयुक्त पुस्तक !

तु म चा प्र श्न
तु म्ही च पा हा

■

लेखक
ज्योतिषभास्कर : पंडित किसनलाल शर्मा

■

। मूल्य : रू. १० फक्त ।

■

* प्राप्तीस्थान *
अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

भाग्यांक

१

भाग्यांक १ हा रवि ग्रहाच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच भाग्यांक १ चा स्वामी ग्रह रवि आहे. रविची राशी आहे सिंह. सिंह राशीचा सत्ताधीश अंक १ आहे.

स्वभाव व गुणदोष - तुमची जीवनशक्ती चांगली असून तुमच्या अंगात भरपूर धमक आहे. तेजस्वीपणा, आकर्षकता, भव्यता, अत्यंत स्वाभिमानीपणा, स्वतःबद्दलच्या विशिष्ट कल्पना आहेत. तुम्हांला टीकेचे वावडे आहे. तुमचे कुल - शील - आचरण किंवा तुमचा स्वभाव दोषाबद्दल कोणी बोललेले तुम्हांला मुळीच खपत नाही. एकंदरीत तुमच्यात कोणत्याही प्रकारची टीका सहन करण्याची ताकदच कमी आहे.

जबरदस्त आत्मविश्वास, काम करण्याची प्रचंड शक्ती व कामाचा दांडगा उरक ही तुमची खास वैशिष्ट्ये आहेत. **भाग्यांक १** चे स्त्री-पुरुष सुखी व नशिबवान असतात. आयुष्यात यांना खूप चांगल्या संधी मिळतात. थोरामोठ्यांचे आशीर्वाद व सहकार्य तुम्हांला सहज लाभते.

तुमचा स्वभाव दिलदार आहे. संकुचितपणा, खुरटेपणा, हलकटपणा व क्षुद्र वृत्ती तुमच्या स्वभावात नाही. कोणाच्याही कामाची प्रशंसा करून त्याला

शाबासकी देणे तुम्हांला जमते.

धार्मिक कार्य असो किंवा राजकीय कार्यक्रम असो त्यावर तुमचा खास ठसा असते. कोणताही समारंभ भव्य असला पाहिजे असाच तुमचा आग्रह असतो. व्यवसायात, राजकारणात किंवा नोकरीत तुम्ही कोठेही असा तुम्ही नेहमी उच्चपदीच रहाल. सत्तालालसा हा तुमचा स्थायीभाव आहे. अधिकार गाजविणे हा तुमचा जन्मसिद्ध अधिकारच होय. तुमचे संबंध, ओळखी, मैत्री नेहमी वरच्या पातळीवरील लोकांबरोबरच असतात.

आपण स्तुतिप्रिय, प्रसिद्धीप्रिय आहात. पाऱ्यासारखा आपला राग लगेच ओसरतो. कोणी तुम्हांला कितीही त्रास देवो, नुकसान करो त्याला तुम्ही क्षमा करणारच. स्वभाव मनमोकळा, विचार स्वतंत्र, कोणाबद्दलही मनात कट - कपट नसणे हा तुमच्या स्वभावाचा आणखी एक पैलू आहे. सुदैवाने, सहज दैवीकृपेने मोठमोठ्या अधिकाराची पदे तुम्हांला सहज मिळतात.

ज्याच्यावर विश्वास टाकता तोच तुमची मान कापतो. कोणावरही सहज विश्वास ठेवल्याने आयुष्यभर तुमची फसगतच होते. एखादी रुपवान स्त्री तुम्हांला सहज फसवू शकेल. तुमचा स्वभाव स्त्रियांच्या बाबतीत संशयी असतो. तुमच्या पत्नीने दुसऱ्या पुरुषाशी फार मोकळेपणाने वागलेले तुम्हांला खपत नाही. तुम्हांला संतती कमी असते.

व्यवसाय - कार्यक्षेत्र - तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

न्यायालयातील वकील, परराष्ट्रखात्याचे वकील, सैन्यातील अधिकारी, कलावंत, नृत्यदिग्दर्शक, स्टुडिओ मॅनेजर, रंगभूषा - वेषभूषा सहाय्यक सल्लागार, प्रोग्रॅम डायरेक्टर, चित्रपट निर्माता, राजकारणात सरपंच, जिल्हा परिषद सभासद, आमदार, खासदार, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, संस्था संचालक, मुख्य विश्वस्त (चीफ ट्रस्टी), सचिव, दिवाणजी, डॉक्टर, इंजिनिअर, रत्नपारखी,

सोनार, सावकार, वृत्तपत्र, साप्ताहिक, पाक्षिक, मासिक इत्यादींचे संपादक, विद्यापीठाचे कुलगुरु, पुस्तक विक्रेते, आकाशवाणी, दूरदर्शन केंद्र प्रमुख, खेळाडू, क्रिकेटपटू, मोठमोठ्या हॉटेलचे, कँन्टीनचे संचालक, आयात निर्यात खात्यातील अधिकारी, संशोधक.

भाग्योदय प्रारंभ - तुमच्या वयाच्या २२ वर्षांनंतर तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही तुमचे कपडे, पेन, बॉलपेनची शाई, घराच्या भिंतीचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे इत्यादीसाठी गडद किंवा फिक्कट पिवळा रंग किंवा सोनेरी रंग किंवा फिक्कट तपकिरी रंग वापरल्यास यशदायक ठरेल. स्त्रिया हे रंग वापरू शकतील; पण पुरुषांना फॅशन व व्यक्तिमत्त्वाच्या दृष्टीने अडचण येऊ शकेल. पुरुषांनी निदान गंजीफ्रॉक, अंडरवेअर व रुमाल तरी या यशदायक रंगाचा वापरावा.

शुभवार - **'रविवार'** व **'सोमवार'** हे तुमचे **'शुभवार'** आहेत. या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही नवीन किंवा महत्त्वाचे काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे १, १०, १९, २८ हे दिनांक तुम्हांला शुभ आहेत. दिनांक २, ४, ७, ११, १३, १६, २०, १५, २९, ३१ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहे.

शुभकाळ - दरवर्षी २१ मार्च ते २८ एप्रिल व १० जुलै ते २० ऑगस्ट हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे - वयोवर्षे १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४ ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे ३, १२, २१ ३०, ३९, ४८, ५७, ६६, ७५ ही वर्षे तुम्हांला

मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे ८, ७, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२, ७१, ८० ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री - प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी - ज्या स्त्री - पुरुष व्यक्तींचे भाग्यांक १, २, ३, ९ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार व भागीदारी केल्यास तुम्हांला यश, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यकारक रत्न - 'माणिक' हे तुमचे भाग्यकारक रत्न आहे. 'माणिक' रत्न सोन्याच्या अंगठीत बसवून घ्यावे. ज्यांना सोने परवडत नसेल त्यांनी तांब्याच्या अंगठीत बसवून घ्यावे. तुमचा शुभदिनांक येत असेल त्या रविवारी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत त्या अंगठीवर **'ॐ घृणि सूर्याय नमः'** या मंत्राने अभिषेक पूजा करून अंगठी करंगळी शेजारील बोटात घालावी. **'अंबर', 'टोपाझ', 'गारनेट'** यांपैकी रत्न वापरले तरी चालेल. अभिषेक पूजा वगैरे मात्र वरीलप्रमाणे करावे.

भाग्यकारक यंत्र -

६	५	८
७	५	३
२	९	४

या सूर्ययंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकाची बेरीज कशीही केली तरी १५ च येते.

ज्या रविवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या दिवशी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत भूर्जपत्रावर ओल्या कुंकवाने किंवा पांढऱ्या कागदावर

डाळिंबीच्या लेखणीने '**ॐ ऱ्हीं सूर्याय नमः**' म्हणत हे यंत्र सोबतच्या आकृतीप्रमाणे लिहावे. लिहिताना सर्व प्रथम आकृतीत दाखविलेल्या ठिकाणी १ अंक लिहावा. नंतर षोडशोपचाराने ह्या यंत्राची पूजा करून या यंत्राची स्थापना देवघरात, तिजोरीत किंवा इतरत्र सुरक्षित ठिकाणी करून त्याची नित्य पूजा करावी. हे यंत्र तुमचे अज्ञान, भय, भ्रम दूर करून तेज, सौभाग्य, ज्ञान आणि संपत्तीत निश्चित वाढ करील.

उपासना - रोज गायत्रीमंत्र किंवा '**ॐ ऱ्हीं सूर्याय नमः**' ह्या मंत्राचा जप १०८ वेळा करावा. उगवत्या सूर्याचे नित्य दर्शन घ्यावे. रविवारचा उपवास करावा. सूर्योपासना वाढवावी. '**सूर्योपासना : साधना आणि साक्षात्कार**' किंमत : २० रुपये, प्रकाशक - **अंजली पब्लिशिंग हाऊस, १५११ सदाशिव पेठ, पेंडसे चाळ, पुणे ४११ ०३०** यांचेकडे हे पुस्तक मिळेल. तसेच, '**अनिष्ट ग्रहपीडा निवारक साधना**' किंमत : ५०रुपये हे आमचे पुस्तकही वरील प्रकाशकाकडे मिळेल.

'तुमचे भाग्यरत्न कोणते ?
याची सविस्तर चर्चा करणारे अभिनव पुस्तक !

तुमचे भाग्यरत्न

■

लेखक
ज्योतिषभास्कर व रत्नविशारद
पंडित किसनलालशर्मा
(मूल्य : रु. ४० फक्त)
—प्राप्तीस्थान—
अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

भाग्यांक

२

भाग्यांक २ हा चंद्राच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच भाग्यांक १ चा स्वामी ग्रह चंद्र आहे. चंद्राची राशी कर्क, कर्क राशीचा सत्ताधीश अंक २ आहे.

स्वभाव व गुणदोष - तुम्ही सात्त्विक, मनाने शुद्ध व निर्मळ आहात. कोमलपणा, हळवेपणा, तीव्र संवेदनक्षमता, उत्कटता, भावनाप्रधान, नाजूकपणा ही तुमच्या स्वभावाची खास वैशिष्ट्ये आहेत. तुम्हांला राजकारण, समाजकारण, सार्वजनिक जीवन, लोककल्याणाची कामे यात रस असतो. जनमानसावर तुमची आपोआप छाप पडते. तुम्ही कुटुंबवत्सल व भावनाप्रधान आहात. तसेच, सोशिक, सहनशील, मायाळू व समजूतदार आहात. आपल्या कामात तुम्ही नेहमी चपळता दाखवता. धर्मावर निष्ठा, गोड पदार्थांची आवड, चांगल्या वस्तूंचा उपभोग घेणारे भाग्यवान आहात.

कोणतीही व्यक्ती संकटात सापडली, की त्याच्या मदतीला धावून जाणे हा तुमचा स्थायीभाव आहे. तुम्ही निष्कपट अंतःकरणाचे असलात तरी एखाद्याची चूक लक्षात आल्यावर त्याला फैलावर घेण्यास मागे पुढे पाहणार नाही. भविष्यकाळाचा वेध घेण्याची मोठी कुवत तुमच्यात आहे. तुमचा मित्रपरिवार मोठा. तुम्ही एकटे किंवा एकलकोंडे असे कधीच सापडणार नाही.

तुमचा स्वभाव हळवा असल्याने क्षणात हसाल तर क्षणात रडाल. तुमच्या अंगच्या गुणांचा योग्य उपयोग न झाल्यास बडबडे, पोकळ अभिमानाच्या बाता मारणारे, काल्पनिक जीवन जगणारे, बेफिकिर, निष्काळजी, सुस्त व आळशी व्हाल. चंचलपणा हा तुमचा जन्मजात अवगुण आहे.

भाग्यांक २ चे स्त्री-पुरुष शांत, निर्मळ, सुस्वभावी, मायाळु, दिलदार, ध्येयवादी, मुत्सद्दी, दूरदृष्टी असणारे, सुंदर असून प्रेमाच्या बाबतीत एकनिष्ठ असतात.

व्यवसाय - कार्यक्षेत्र - तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

दूध, दारू, प्रवाही औषधे यांची विक्री सार्वजनिक संस्था, राजकारण, हॉस्पिटलमध्ये नर्स, सिस्टर, वॉर्ड बॉय, हॉटेल - उपहारगृह, लॉजिंग - बोर्डिंग-कॅंटिन, मिठाईचे दुकान, छापखाना, प्रकाशक, शेतकरी, शेतमजूर, भाजीपाल्याची विक्री, रेल्वे पोर्टर, रेल्वे हमाल, प्यून (पट्टेवाला), वाहतुक खात्यातील नोकरी, कमिशन एजंट, इस्टेट ब्रोकर, नावाडी, गिरणी कामगार, स्टॅंपव्हेंडर, स्टॅंपरायटर, बॅंकेत कारकून, मेकॅनिक, जॉबर, इंजिनिअर, फिटर, हेल्पर, सैन्यात अधिकारी, किराणा भुसार मालाचे दुकानदार, पेंटर, प्रवासी एजंट, ज्योतिषी, स्त्रियोपयोगी वस्तूंचा व्यापार, ब्युटीपार्लर, हेअर कटींग, सलून, महिलांनी चालवलेल्या संस्थांचे अध्यक्ष, चिटणीस.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयाच्या २५ वर्षानंतर तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही तुमचे कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घराच्या भिंतींचा, फर्निचरचा रंग, घरातील पडदे इत्यादीसाठी फिक्कट निळा, गुलाबी, पांढरा, हिरव्या रंगाची झलक असलेला, द्राक्षी (द्राक्षाच्या रंगासारखा) रंग वापरल्यास यशदायक ठरेल.

शुभवार - **'रविवार', 'सोमवार'** व **'शुक्रवार'** हे तुमचे **'शुभवार'** आहेत. या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही नवीन किंवा महत्त्वाचे काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे २, ११, २०, २९ हे दिनांक शुभ आहेत. दिनांक १, ४, ७, १०, १३, १६, २२, २५ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी **२० जून ते २५ जुलै** हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे - वयोवर्षे २, ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५, ७४ ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे ३, १२, २१, ३०, ३९, ५७, ६६, ७५ ही वर्षे तुम्हांला मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८, ७७ ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री - प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी - ज्या स्त्री-पुरुष व्यक्तींचे भाग्यांक १, २ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार, भागीदारी केल्यास तुम्हांला यश, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यकारक रत्न - **'मोती'** हे तुमचे भाग्यकारक रत्न आहे. बिनछिद्राचा पांढरा मोती चांदीच्या अंगठीत बसवून घ्यावा. ही अंगठी करंगळीत वापरावी. अंगठी वापरण्यापूर्वी तुमचा शुभदिनांक ज्या सोमवारी येईल त्या सोमवारी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत या अंगठीवर **'ॐसों सोमाय नमः'** हा मंत्र म्हणत दुधाने अभिषक करावा. साधे पाणी घालून स्वच्छ कापडाने पुसून

त्याला पांढरे चंदनाचे गंध लावून पांढरी फुले आणि अक्षता वाहाव्यात व मग करंगळीत वापरण्यास सुरुवात करावी.

भाग्यकारक यंत्र -

७	२	९
८	६	४
३	१०	५

या चंद्र यंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकांची बेरीज कशीही केली तरी १८ च येते.

ज्या सोमवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या दिवशी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत भूर्जपत्रावर किंवा पांढऱ्या जाड कागदावर कापूर मिश्रीत पांढऱ्या चंदनाच्या शाईने, तुळशीच्या लेखणीने, '**ॐ सों सोमाय नमः**' हे यंत्र सोबतच्या आकृतीप्रमाणे लिहावे. लिहिताना सर्वप्रथम आकृतीत दाखविल्याप्रमाणे २ हा अंक लिहावा. नंतर षोडशोपचाराने ह्या यंत्राची पूजा करून या यंत्राची स्थापना देवघरात, तिजोरीत, दुकानाच्या गल्ल्यात किंवा इतरत्र सुरक्षित ठिकाणी करून त्याची नित्य पूजा करावी. हे यंत्र तुमचे मन स्थिर करून सौभाग्य, ज्ञान व संपत्तीत निश्चित वाढ करील.

उपासना - रोज '**ॐ श्रीं नमः**' हा मंत्र १०८ वेळा म्हणावा. '**गणपति अथर्वशीर्ष**' रोज एकदा म्हणावे. संकष्टी व मंगळवारचा उपवास करावा. गणेश दर्शन घ्यावे.

भाग्यांक

३

भाग्यांक ३ हा गुरूच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच भाग्यांक ३ चा स्वामी ग्रह गुरु आहे. गुरुच्या धनु व मीन या दोन राशी आहेत. धनु व मीन राशींचा सत्ताधीश अंक ३ आहे.

स्वभाव गुणदोष - तुम्ही सात्त्विक वृत्तीचे, उदार अंतःकरणाचे व धर्मावर निष्ठा ठेवणारे आहात. सभोवतालच्या परिस्थितीचा अंदाज तुम्हांला तत्काळ घेता येतो. तुमची बुद्धिमत्ता व व्यक्तिमत्त्व यामुळे तुम्ही दुसऱ्यावर चटकन् छाप पाडता. छक्के - पंजे तुम्हांला माहीत नाहीत. स्पष्ट व सत्यवक्ते आहात. मानसन्मान, यश, कीर्ति आपण होऊन तुमच्याकडे चालून येतात. आत एक व बाहेर एक असा तुमचा स्वभाव नाही. काही वेळा या तुमच्या स्वभावामुळे तुमचे नुकसान होते. मेहनत, पडेल ते काम करण्याची शक्ती व प्रवृत्ती तुमच्यात आहे. पैशाच्या व्यवहारात आपण चोख असता. काही वेळा नफा नुकसानीची पर्वा न करता कोणाचे पैसे ठेवायचे नाहीत ही भूमिका तुम्ही घेता. त्यामुळे तुम्हांला आर्थिक तोशीस सहन करावी लागते. राजकारणात रचनात्मक व विधायक कार्यात तुम्हांला रस असतो. माता - पिता व थोरांची सेवा करण्यात तुम्हांला आनंद वाटतो.

भाग्यांक ३ चे स्त्री पुरुष चारित्र्यवान असतात. त्यामुळे तुमच्या बोलण्या चालण्यात अश्लिलता, बीभत्सता, असभ्यता, हलकटपणा आढळून येत नाही. तुम्ही आई-वडील, थोरला भाऊ यांना मान जरूर देता; पण वागताना स्वतःच्या मतानेच वागता. सर्वांशी प्रेम व सलोखा ठेवण्याचा तुमचा स्वभाव आहे. कोणत्याही विषयाचे चटकन आकलन करणे हा तुमचा स्थायीभाव आहे. तुम्ही संसारात विशेष गुरफटले जाणार नाहीत. संन्यस्त प्रवृत्तीचा जोर या बाबतीत आढळून येतो. हुकूमशहा बनण्याच्या प्रवृत्तीमुळे तुम्हांला शत्रू फार होतात. कोणाचेही नियंत्रण तुम्हांला सहन होत नाही.

व्यवसाय - कार्यक्षेत्र - तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

सरपंच, आमदार, मंत्री, खासदार, बँक मॅनेजर, धर्मगुरु, धर्मप्रचारक, धर्मोपदेशक, पुराणिक, पुरोहित, मंदिराचे पुजारी, कीर्तनकार, प्राध्यापक, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणसंस्थेचे व्यवस्थापक, वकील, सरकारी वकील, न्यायाधीश, कायदा सल्लागार, कोर्टात कारकून, सिनेनट, सिनेमा थिएटरचे व्यवस्थापक, लेखक, ज्योतिषी, व्यवसाय मार्गदर्शक, धान्याचा व्यापार.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयाच्या १३ पासून तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घराच्या भिंतीचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे, इत्यादीसाठी पिवळा, निळा, लाल, गुलाबी किंवा जांभळा रंग वापरल्यास यशदायक ठरेल.

शुभवार - **'मंगळवार', 'गुरूवार', 'शुक्रवार'** हे तुमचे **'शुभवार'** आहेत. या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही महत्त्वाचे किंवा नवीन काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे **३, १२, २१, ३०** हे दिनांक शुभ

आहेत. दिनांक १, २, १०, ११, १९, २८, २९ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी १६ फेब्रुवारी ते २१ मार्च आणि २१ नोव्हेंबर ते २१ डिसेंबर हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे - वयोवर्षे ३, १२, २१, ३०, ३९, ४८, ५७, ६६, ७५, ८४ ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे १, १०, ११, १९, २०, २८, ३७, ४६, ५५, ६४, ७३ ही वर्षे तुम्हांला मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे ६, १५, २४, ३६, ४२, ५१, ६०, ७७, ८६ ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री - प्रेमसंबंध - विवाह- व्यापार - भागीदारी - ज्या स्त्री-पुरूष व्यक्तीचे भाग्यांक १, २, ३ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार व भागीदारीत तुम्हांला यश, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यकारक रत्न - 'पुष्कराज' हे तुमचे भाग्यकारक रत्न आहे. पिवळा पुष्कराज सोन्याच्या अंगठीत बसवून घ्यावा. ही अंगठी अंगठ्याशेजारील बोटात वापरावी. अंगठी वापरण्यापूर्वी तुमचा शुभदिनांक ज्या गुरुवारी येईल त्या गुरुवारी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत या अंगठीवर '**ॐ बृं बृहस्पतये नमः**' ह्या मंत्राने अभिषेक पूजा करावी. नंतर अंगठी वापरण्यास सुरवात करावी.

भाग्यकारक यंत्र -

१०	५	१२
११	९	८
६	१३	८

या गुरु यंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकांची बेरीज कशीही केली तरी **२७** च येते.

ज्या गुरुवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या दिवशी सूर्योदयापासून एका तासाच्या अवधीत भूर्जपत्रावर किंवा पांढऱ्या जाड कागदावर अष्टगंधाच्या शाईने डाळिंबाच्या लेखणीने '**ॐ बृं बृहस्पतये नमः**' हा मंत्र म्हणत लिहावे. लिहिताना सर्वप्रथम आकृतीत दाखवलेल्या ठिकाणी ५ अंक लिहावा. नंतर षोडशोपचाराने या यंत्राची पूजा करून यंत्राची स्थापना देवघरात करावी. बाकी देवांबरोबर या यंत्राचीही नित्य पूजा करावी. हे यंत्र चमत्कारिक रीत्या तुमच्या जीवनाला चांगले वळण लावून तुमच्या ज्ञानात व संपत्तीत वाढ करून अंगिकृत कार्यात यश देईल.

उपासना - 'ॐ दत्तात्रयाय विद्महे। योगेश्वराय धीमहि तन्नो दत्त प्रचोदयात ॥' या दत्त गायत्रीचा रोज १०८ वेळा जप करावा. पू. वासुदेवानंद सरस्वती टेंब्ये स्वामी विरचित '**दत्तमाहात्म्य**' या ग्रंथाचे पारायण करावे. पारायणाची पद्धती या अद्भुत ग्रंथाच्या प्रारंभीच दिली आहे. गुरुवारचा उपवास करावा. दत्तदर्शन नियमित घ्यावे. दत्तोपासना वाढवावी. '**श्री दत्त उपासना**' किमंत : ६ रुपये, प्रकाशक - **अंजली पब्लिशिंग हाऊस, १५११ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.** या पुस्तकाचा दत्तोपासनेसाठी चांगला उपयोग होईल.

प्रभावी मंत्र व उपासनेसह

ग्रहपीडा निवारण

(किंमत : रु. ८ फक्त)

*** प्राप्तीस्थान ***

अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

भाग्यांक

४

भाग्यांक ४ हा हर्षलच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच ४ भाग्यांकाचा स्वामी ग्रह 'हर्षल' आहे. हर्षलची राशी आहे कुंभ. या राशीचा सत्ताधीश अंक ४ आहे.

स्वभाव व गुणदोष - असामान्य कल्पनाशक्ती, उत्तम स्मरणशक्ती, संशोधक वृत्ती, सत्याची चाड, प्रत्येक गोष्टीचे मूळ शोधून काढण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे ही तुमची वैशिष्ट्ये आहेत. कोणतीही गोष्ट तळमळीने करावयाची तुमची सवय असते.परमेश्वरावरही तुमची अपार श्रद्धा आहे. एकीकडे जुन्या गोष्टीचे आकर्षण - अध्यात्माची आवड तर दुसरीकडे विज्ञानाची, संशोधनाची आवड, रेडिओ, टी. व्ही. व्ही. सी. आर.,कॉम्प्युटर, कॅलक्युलेटर्स, यंत्रमानव इत्यादी शोध लावण्यास तुम्हीच कारणीभूत आहात. मंत्रतंत्र, जादूटोणा, गूढविद्या ही क्षेत्रेही तुम्हीच व्यापलेली आहेत. लोक तुम्हांला लहरी - विक्षिप्त म्हणतात. आपल्या डोक्यातून निघणारी कल्पना इतकी विलक्षण असते, की ती प्रत्यक्षात येईल, की नाही याबद्दल इतरांचा विश्वासच बसत नाही; पण ती कल्पना तुम्ही प्रत्यक्षात आणून दाखवता तेव्हा लोक तुम्हांला 'महान संशोधक' म्हणतात. पत्नी व मुलेबाळे या प्रपंचात तुमचे

मन रमत नाही. कसा तरी संसाराचा गाडा रेटणे तुम्हांला मान्य नाही. ग्रंथ, पुस्तके व प्रयोगशाळा हाच खरा तुमचा संसार !

तुम्हांला व्यवहारातील काटेकोरपणा पाळता येत नाही. त्यामुळे तुमचा गैरफायदा लोक घेतात. हिशेबीपणा, धूर्तपणा व व्यावहारिकपणाच्या अभावामुळे तुम्ही कधी व्यापारात यशस्वी होणार नाही. तुम्हांला रागही फार लवकर येतो.

भाग्यांक ४ चे स्त्री-पुरुष इंद्रिय सुखापेक्षा बौद्धिक सुखात जास्त रममाण होतात. भावा - बहिणींचे व मुलाबाळांचे सुख तुमच्या नशिबी कमीच असते. खर्चिक स्वभावामुळे पैसा हातात कधी शिल्लकच राहत नाही.

व्यवसाय - कार्यक्षेत्र - तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

इलेक्ट्रॉनिक्ससंबंधी सर्व क्षेत्रे, इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर, बिल्डिंग कॉंट्रॅक्टर, फर्निचर बनवणे, सुतार, गवंडी, मुकादम, सिमेंटचा कारखाना, कौलांचा कारखाना, बिल्डिंग मॅनेजर, न्यायाधीश, अर्थखात्याशी संबंधित नोकरी, अंमलबजावणी अधिकारी, छापखाना व्यवस्थापक, प्रकाशक, ग्रंथविक्रेता, तांत्रिक, मांत्रिक, ज्योतिषी, शेती, बागायतदार, माळी, दगडाच्या खाणी व तत्संबंधी व्यवसाय, कथील, शिसे हे धातू, प्लॅस्टिक, प्लॅस्टिक मोल्डर, कोळशाची वखार, कातडी कमवणे, कातडी वस्तू, बूट, चप्पल, सर्व तऱ्हेच्या बॅग्ज, शेवपेट्या बनवणारे, शिवणकाम करणारे.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयाच्या ३३ वर्षांनंतर तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घराच्या भिंतीचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे इत्यादीसाठी निळा, खाकी, भुरकट, धूपछाँव रंग (हा रंग स्त्रियांना चांगला माहीत आहे. कारण धूपछाँव साडी या रंगामुळेच

प्रसिद्ध आहे.) हे रंग वापरल्यास यशदायक ठरेल.

शुभवार - 'रविवार', 'सोमवार' व **'शनिवार'** हे तुमचे **'शुभवार'** आहेत. या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही महत्त्वाचे किंवा नवीन काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे ४, १३, २२, ३१ हे दिनांक शुभ आहेत. दिनांक २, ११, २०, २९ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी **२१ जून ते २० जुलै व २१ जुलै ते ३१ ऑगस्ट** हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे.

भाग्यकारक वयोवर्षे - वयोवर्षे १३, २२, ३१, ४०, ४९, ५८, ६७, ७६, ८५ ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५ आणि ७४ ही वर्षे तुम्हांला मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे ८, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२, ७१ ही तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री- प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी - ज्या स्त्री -पुरुष व्यक्तींचे भाग्यांक २, ४ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार व भागीदारी केल्यास तुम्हांला यश, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यकारक रत्न - 'अलेक्झांड्रा' किंवा **'इंद्रनील'** हे तुमचे भाग्यकारक रत्न आहे. हे रत्न सोने किंवा पंचधातूच्या अंगठीत बसवून घ्यावे. ज्या शनिवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या शनिवारी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत या अंगठीवर तुम्ही तुमच्या इष्टदेवतेचा किंवा कुलदेवतेचा मंत्र कमीत कमी १०८ वेळा म्हणून अभिषेक पूजा करून मधल्या बोटात (अंगठ्यापासून

तिसऱ्या बोटात) अंगठी वापरण्यास सुरुवात करावी. ज्यांना आपली इष्टदेवता किंवा कुलदेवता माहीत नसेल त्यांनी '**ॐ ऐं ऱ्हीं क्लीं चामुंडायै विच्चे ।**' या देवी मंत्राने अभिषेक करावा. ज्यांना शक्य असेल त्यांनी '**देवीसूक्ता**'ची कमीत कमी ११ आवर्तने करावीत. मधल्या बोटात अंगठी घालू नये असे काही ज्योतिषी सांगतात त्याला शास्त्रीय आधार नाही.

भाग्यकारक यंत्र -

१२	७	१४
१३	११	९
८	१५	१०

या शनि यंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकांची बेरीज कशीही केली तरी **३३** च येते.

ज्या शनिवारी तुमचा शुभदिनांक येईल त्यादिवशी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत चौकोनी लोखंडी पत्र्यावर किंवा निळ्या जाड कागदावर काळ्या शाईने हे यंत्र लिहावे. सर्वप्रथम आकृतीत दाखवलेल्या ठिकाणी १३ हा अंक लिहावा. यंत्र लिहिताना '**ॐ शनैश्चराय नमः**' हा मंत्र म्हणावा. नंतर या यंत्राची पूजा करून त्याची देवघरात स्थापना करावी. नित्य पूजा करावी. हे यंत्र तुमचे कोटकल्याण करील. तुमच्या सर्व कार्यात यश देईल.

उपासना - 'ॐ नमो भगवते आंजनेयाय महाबलाय हूं फट् घे घे घे घे घे घे स्वाहा ।भूतप्रेत पिशाच्च ग्रहादिन परिहार परिहार । श्रीराम जयराम जयराम ॥' हा प्रभावी मंत्राचा रोज जास्तीत जास्त जप करावा. शनिवारी थोडे काळे उडीद व खडे मीठ मारुतीला अर्पण करून नमस्कार करावा. कुलदेवतेची उपासना करावी. '**देवीसूक्त**' व '**श्रीसूक्ता**'ची आवर्तने करावीत.

भाग्यांक

५

भाग्यांक ५ हा बुधाच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच ५ भाग्यांकाचा स्वामी ग्रह बुध आहे. बुधाच्या मिथुन व कन्या या दोन राशी आहेत. या दोन्ही राशींचा सत्तार्धांश अंक ५ आहे.

स्वभाव व गुणदोष:- जसा तुमच्या मनाचा थांगपत्ता कोणालाही लागत नाही. तसेच, तुमचे वय कोणाला सांगता येत नाही. स्वच्छता, व्यवस्थितपणा, टापटीप, वक्तशीरपणा हे तुमचे गुण आहेत. विषयवासना कमी असते. **भाग्यांक ५** चे तुम्ही स्त्री- पुरुष चंचल असता. तुमचे प्रेम नक्की कोणावर आहे याचा पत्ता तुम्हांला नसतो. भाग्यांक ५ ची स्त्री पूर्णपणे समर्पण करणारी नसते. तुम्ही स्वतः कोणाशी भांडत नाही; पण दुसऱ्यांची भांडणे लाऊन देण्याची सवय तुम्हांला आहे. मर्दानी खेळ तुम्हांला आवडत नाहीत. बैठे खेळ तुम्हांला प्रिय आहेत. तुमची अतिशय तीव्र बुद्धिमत्ता, चांगले वक्तृत्व, विनोद बुद्धी व अभिनय कला वाखाणण्याजोगी असते. आयुष्यातील प्रत्येक गोष्टीकडे तुम्ही व्यापारी दृष्टीने पाहता. तुमच्या बोलण्यात गोडवा असतो. बेसुऱ्या किंवा कर्कश आवाजाचे तुम्हांला वावडे आहे. इतरांविषयी प्रेम व सहानुभूती तुमच्या ठायी आहे. चिकित्सा, संशयखोर वृत्ती, भित्रेपणा हे दुर्गुण तुमच्यात आहेत. रणांगण

गाजविणे किंवा शत्रूशी समोरासमोर झुंज देणे तुम्हांला जमत नाही; पण कावेबाजपणाने, मुत्सद्दीपणाने शत्रूला तुम्ही नामोहरम करता.

त्वरित फायदा देणारा व्यवसाय करण्याची प्रवृत्ती तुमच्यात आहे. सट्टा करण्याकडे तुमचा जास्त कल असतो. एखाद्या नुकसानीबद्दल किंवा वाईट घटनेबद्दल फार काळ शोक, चिंता किंवा पश्तात्ताप करत बसण्याची सवय तुम्हांला नाही. एखादा मानसिक आघात झाला किंवा कोणाकडून तुम्ही दुखावला गेला तरी चटकन विसरून पूर्ववत कामाला लागता. कामात फार शक्ती खर्च करीत राहिल्याने अशक्तपणा येऊन मूर्च्छा येण्याची शक्यता असते. डॉक्टर याला 'नर्व्हस ब्रेकडाऊन' म्हणतात. तसा त्रास होतो. त्यामुळे तुमच्या स्वभावात चिडचिडेपणा, उतावीळपणा, शीघ्रकोपीपणा जाणवतो. ५ भाग्यांकाच्या काही व्यक्ती चलाख, धूर्त, आपला कार्यभाग साधून घेण्यात हुशार अशाही आढळतात.

अंतर्ज्ञानाची दैवी शक्ती असल्याने दुसऱ्याचा आवाज ऐकून त्या व्यक्तीच्या चारित्र्याविषयीची संपूर्ण माहिती तुम्हांला चटकन समजते.

व्यवसाय - कार्यक्षेत्र:- तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

संपादक, वार्ताहर, लेखक, स्तंभलेखक, समीक्षक, विनोदी व टीकात्मक लेखन, अनुवादक, बालवाङ्मय, ज्योतिष विषयक लेखन, जाहिरात प्रतिनिधी, जाहिरात व्यवसाय करणाऱ्या कंपनीत नोकरी, प्रवचनकार, कीर्तनकार, पुराणिक, शिक्षक, प्राध्यापक, कोणत्याही ऑफिसमध्ये कारकून, पोस्ट, रेडिओ, टी. व्ही. त नोकरी, छापखाना, जहाज व रेल्वेशी संबंधित व्यवसाय कार्टिंग एजंट, चित्रपट, रंगभूमी हा व्यवसाय किंवा या व्यवसायात नोकरी, शेअरबाजार, अडतीचा व्यापार, शेअर्स, सट्टा व्यवसाय, किराणाभुसार व स्टेशनरी दुकान, प्रसिद्धी खाते, इन्शुअरन्समध्ये नोकरी, भाजीपाला विक्री

किंवा दलाली, संशोधन, ज्योतिष.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयाच्या २३ वर्षानंतर तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घराच्या भिंतीचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे इत्यादीसाठी फिक्कट खाकी रंग साधारण काळसर - स्लेटकलर, धुरकट, फिक्कट गुलाबी, फिक्कट हिरवा, फिक्कट निळा रंग, चमकदार रंग हे रंग वापरल्यास यशदायक ठरेल.

शुभवार - **'बुधवार'**, **'गुरुवार'**, **'शुक्रवार'** हे तुमचे **'शुभवार'** आहेत. या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही महत्त्वाचे किंवा नवीन काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे ५, १४, २३ हे दिनांक शुभ आहेत. दिनांक १, १०, १९, २८ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी **२१ मे ते २० जून** आणि **२१ ऑगस्ट ते २० सप्टेंबर** हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे:- वयोवर्षे ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८, ७७ ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४ ही वर्षे तुम्हांला मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे २, ११, २०, २९, ३८, ४४, ५६, ६५ ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री - प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी:- ज्या स्त्री- पुरुष व्यक्तींचे भाग्यांक ५, १ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार, भागीदारी केल्यास तुम्हांला यश, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यदायक रत्न - **'पाचू'** किंवा **'फिरोजा'** हे तुमचे भाग्यकारक रत्न आहे. पाचू सोन्यात व फिरोजा चांदीच्या अंगठीत बसवून घ्यावा. ज्या बुधवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या बुधवारी सकाळी सूर्योदयापासून एका तासाच्या अवधीत **'ॐ बुं बुधाय नमः'** या मंत्राने अभिषेक - पूजा करून करंगळीत अंगठी वापरावी. **'एमरॉल्ड'** नावाचा खडा वापरला तरी चालेल; पण वरीलप्रमाणे पूजा करावी.

भाग्यकारक यंत्र

९	४	११
१०	८	६
५	१२	७

या बुध यंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकांची बेरीज कशीही केली [illegible]४ च येते.

ज्या बुधवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या दिवशी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत भूर्जपत्र किंवा पांढऱ्या जाड कागदावर अष्टगंधात तुळशीच्या पानांचा रस घालून डाळिंबाच्या लेखणीने हे यंत्र लिहावे. सर्वप्रथम आकृतीत दाखवलेल्या ठिकाणी ५ हा अंक लिहावा. **'ॐ बुं बुधाय नमः'** हा मंत्र म्हणावा. नंतर या यंत्राची पूजा करून खडीसाखरेचा नैवेद्य दाखवावा. देवघरात या यंत्राची स्थापना करून पूजा करावी. बुधवारीच उपवास करावा. वर सांगितलेला मंत्र रोज जास्तीत जास्त जपावा. हे यंत्र तुमच्या सर्व कार्यात यशलाभ देईल.

उपासना - लक्ष्मीची उपासना तुम्हांला लाभदायक ठरेल. **'ॐ श्रीं श्रिये**

नमः' या सोप्या मंत्राचा जप कमीत कमी १०८ वेळा रोज करावा. पौर्णिमा व्रत करावे. '**वैभवलक्ष्मी**' व्रत करावे. '**श्रीसूक्ता**'च्या १ ते १५ ऋचा रोज म्हणावेत. प्रत्येक ऋचेपूर्वी '**ॐ श्रीं ह्रीं कमले कमलालये प्रसीद प्रसीद श्रीं ह्रीं श्री ॐ महालक्ष्मै नमः ।**' हा मंत्र म्हणावा. या पद्धतीने '**श्रीसूक्ता**'चे पठण केल्याने लवकर व चांगला अनुभव येतो. '**श्रीसूक्त - विविध उपासना**' किंमत : १० रुपये. '**वैभवलक्ष्मी**' किंमत ३ ॥ रुपये. ही दोन्ही पुस्तके, **अंजली पब्लिशिंग हाऊस, १५११ सदाशिव पेठ, पेंडसे चाळ, पुणे ४११ ०३०** यांनी प्रकाशित केलेली आहेत. ही पुस्तके मागवून त्यांचा उपयोग करावा.

शापपीडा, पिशाच्चबाधा निवारक, संतान प्राप्तीसाठी

त्रिपिंडी

नारायण नागबळी

कालसर्पयोग

■

* लेखक *

ज्योतिषभास्कर- पंडित किसनलाल शर्मा

■

(किंमत : रु. ८ फक्त)

■

* प्राप्तीस्थान *

अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

भाग्यांक

६

भाग्यांक ६ हा शुक्राच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच ६ भाग्यांकाचा स्वामी ग्रह शुक्र आहे. शुक्राच्या वृषभ व तुळ या दोन राशी आहेत. या दोन्ही राशींचा सत्ताधीश अंक ६ आहे.

स्वभाव व गुणदोष:- तुमचे व्यक्तिमत्त्व आकर्षक आहे. आर्थिक दृष्ट्या तुम्ही नशिबवान आहात. संपत्ती, ऐश्वर्य, भोगविलास या गोष्टी तुम्हांला थोड्या प्रयत्नाने सहज मिळतात. भांडणतंडण, आदळआपट या गोष्टींचे तुम्हांला वावडे आहे. तडजोड वृत्ती, समन्वय साधण्याची कला उपजतच तुमच्या भाग्यांकाने तुम्हांला दिली आहे. तुम्ही प्रेम, सहवास व जिव्हाळ्याचे भुकेले व आसुसलेले असता. रंगेल व रगेल स्वभावाचे तुम्ही काहीसे आळशीही असता. कामाची कल्पकता, काम पूर्ण करण्याची धमक व ताकद तुमच्यात फार मोठी आहे. एकदा कोणत्या कार्याची जबाबदारी तुम्ही उचललीत, की मग कितीही कष्ट उपसावे लागले तरी त्याची तमा न बाळगता ते कार्य पूर्ण करण्याची तुमची शक्ती बेजोड आहे. आर्जवी व गोड बोलण्याने तुम्ही कोणालाही सहज भुरळ घालू शकता. लोकांना तुम्ही हवेहवेसे वाटता. तुमची सौंदर्याभिरूची, रसिकता, तुमच्या स्वभावात ठासून भरलेली असल्याने तुमचे

घर टापटीप, प्रत्येक वस्तू जिथल्या तिथे असते. **'सत्यं शिवं सुंदरम्'** या त्रिसूत्रीवर तुमचा गाढ विश्वास आहे. ढोंगीपणा, खोटेपणाचा तुम्हांला मनस्वी तिरस्कार वाटतो. आपण भोगी आहात तसे त्यागीही आहात. आईवडिलांची सेवा करण्यात तुम्ही स्वतःला कृतार्थ मानता.

६ भाग्यांकाचे स्त्री- पुरुष कामक्रीडेत प्रवीण असतात. ६ भाग्यांकाची पत्नी पुरुषाला मिळणे किंवा ६ भाग्यांकाचा पति स्त्रीला मिळणे हे अहोभाग्यच !

हट्टीपणा हा तुमचा दुर्गुण आहे. तसेच, कोणावरही पूर्ण विश्वास ठेवणे हा ही अवगुणच समजला पाहिजे. या अवगुणामुळे बऱ्याच वेळा तुमचा विश्वासघात होऊन तुम्हांला आर्थिक फटका बसतो. तुम्हांला एक प्रकारची अंतःस्फूर्ती असते. ह्या ईश्वरदत्त शक्तीमुळे आयुष्यात तुम्हांला धोके टाळता येतील.

व्यवसाय - कार्यक्षेत्रः- तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

ब्युटी पार्लर, लेडीज डिपार्टमेंटल स्टोअर, सौंदर्य प्रसाधनांची विक्री, सौंदर्य प्रसाधनांच्या कारखान्यात नोकरी, सौंदर्य प्रसाधनांचे विक्री प्रतिनिधी, फिरते एजंट, रंग रसायनाचा कारखाना, कारखान्यात नोकरी, फॅशन डिझायनर, सुगंधी सामानांचे कारखानदार- विक्रेते, रिसेप्शनिस्ट, एअर होस्टेस, टेलिफोन ऑपरेटर, जवाहिरांचा व्यवसाय, मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे संयोजक, कॉन्ट्रॅक्टर, शिक्षक, प्रोफेसर, प्रिन्सिपॉल, दिग्दर्शक, अभिनेता, रंगभूषा प्रवीण, कलादिग्दर्शक, राजकारणी, ललित लेखक, चित्रपट कथा - संवाद लेखक, कवि, सराफ, सुवासिक अत्तरे तयार करणे किंवा विकणे, डॉक्टर, नर्स, सिस्टर, वॉर्ड बॉय, भरतकाम - विणकाम करून त्या वस्तू विकणे, कापडाचा व्यापार, शिंपी, मेवामिठाईचे दुकान.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयाच्या २४ व्या वर्षी तुमचा भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घराच्या भिंतीचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे, इत्यादीसाठी फिक्कट व गर्द निळा, गुलाबी, हिरवा, लाल, पांढरा ह्या रंगाचा वापर केल्यास यशदायक ठरेल. कोणत्याही परिस्थितीत काळा रंग वापरू नये. काळ्या रंगाच्या चपला, बुटही वापरू नयेत.

शुभवार - **'मंगळवार'**, **'बुधवार'** व **'शुक्रवार'** हे तुमचे 'शुभवार' आहेत. या शुभवारी तुमचे शुभ दिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही नवीन किंवा महत्त्वाचे काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे **६, १५, २४** हे दिनांक शुभ आहेत. दिनांक ५, १४, २३ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी **२१ एप्रिल ते २० मे** आणि **२० सप्टेंबर ते २० ऑक्टोबर** हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे:- वयोवर्षे **६, १५, २४, ३३, ४२, ५१, ६०, ६९, ७८** ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे **३, ६, ९, १२, १५, १८, २१, २४, २७, ३०, ३४, ३६, ३९, ४५, ४८, ५१, ६०, ६३, ६६, ७२, ७५** ही वर्षे तुम्हांला मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे **१, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४** ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री - प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी:- ज्या स्त्री- पुरुषांचे भाग्यांक **३, ६, ९** यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार व भागीदारी केल्यास तुम्हांला यश, आनंद आणि समाधान मिळेल.

भाग्यकारक रत्न - 'हिरा', 'अमेरिकन डायमंड' व 'फिरोजा' ही तुमची भाग्यकारक रत्ने आहेत. यांपैकी कोणतेही रत्न अंगठ्यापासून पाचव्या बोटात वापरावे. हिरा किंवा अमेरिकन डायमंड वापरावयाचा असेल तर ज्या शुक्रवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या शुक्रवारी सकाळी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत **'ॐ शुं शुक्राय नमः'** या मंत्राने अभिषेक पूजा करून अंगठी वापरावी. हिरा सोन्यात व अमेरिकन डायमंड चांदीत बसवावा. फिरोजा वापरावयाचा असेल तर ज्या बुधवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या बुधवारी सकाळी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत **'ॐ बुं बुधाय नमः'** या मंत्राने अभिषेक पूजा करून वापरावा. फिरोजा रत्न चांदीत बसवून घ्यावे.

भाग्यकारक यंत्र

११	६	१३
१२	१०	८
७	१४	९

या शुक्र यंत्राची पूजा उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकाची बेरीज कशीही केली तरी ३० च येते.

ज्या शुक्रवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या दिवशी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत भूर्जपत्र किंवा पांढऱ्या जाड कागदावर अष्टगंधाच्या शाईने डाळिंबाच्या लेखणीने लिहावे. सर्व प्रथम आकृतीत दाखवलेल्या ठिकाणी ६ हा अंक लिहावा. यंत्र लिहिताना **'ॐ शुक्राय नमः'** हा मंत्र म्हणत रहावा. देवघरात या यंत्राची स्थापना करून रोज पूजा अर्चा करावी. यंत्र मंत्र नित्य म्हणावा. हे यंत्र ताईतात बंद करून गळ्यात किंवा उजव्या दंडावर बांधले तरी त्याचा उपयोग होतो. हे यंत्र सरकार दरबारी, उद्योग व्यवसायात, प्रवासात

तुम्हांला खूप यश देईल.

उपासना - **'ॐ श्रीम् नमः'** हा मंत्र रोज १०८ वेळा म्हणावा. **'सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।'** या मंत्राचे नित्य पठण करावे. श्रीसूक्ताची १६ आवर्तने करावीत. शुक्रवारचा उपवास करावा. वैभवलक्ष्मी व्रत करावे. प्रदोष करणे शक्य असेल तर त्यांनी प्रदोष करावा. **'वैभवलक्ष्मी'** व **'श्रीसूक्त · विविध उपासना'** प्रकाशक - **अंजली पब्लिशिंग हाऊस, १५११ सदाशिव पेठ, पेंडसे चाळ, टिळक स्मारक मंदिर ते पेरुगेट रस्ता, पुणे ४११०३०** यांच्याकडून ही दोन्ही पुस्तके मागवून घ्यावीत. उपासना वाढविण्यास ही पुस्तके तुम्हांला निश्चितच मार्गदर्शक ठरतील.

* होरारत्न अरविंद सहस्रबुद्धे *

यांची

उपयुक्त व संग्राह्य २ पुस्तके

साडेसाती आणि प्रभावी दैवी उपाय

(किंमत : रु. ५ फक्त)

■

तुमचे १०८ प्रश्न आणि त्यांची अचूक उत्तरे

(किंमत : रु. ५ फक्त)

■

* प्राप्तीस्थानी *

अंजली पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०

भाग्यांक
७

भाग्यांक ७ हा नेपच्यूनच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच ७ भाग्यांकाचा तो स्वामी ग्रह आहे. नेपच्यूनची राशी आहे मीन. या राशीचा सत्ताधीश अंक ७ आहे.

स्वभाव व गुणदोषः- नाविन्य, अफाट कल्पनाशक्ती, भावुकता, स्वतंत्र विचारसरणी, एकांत चिंतन, संशोधक वृत्ती, उदार अंतःकरण, जबरदस्त अंतर्ज्ञान, विलक्षण रहस्यमय प्रतिभा या गुणांचा संचय तुमच्यात आहे. जीवनशक्ती कमी असली तरी शरीर निरोगी राहते. असभ्यपणा, गावंढळपणा याचे तुम्हांला वावडे असते. तुम्ही अत्यंत भावनावश असल्यामुळे आयुष्यातील महत्त्वाचे निर्णय घेताना मेंदूपेक्षा अंतःकरणाचाच जास्त उपयोग करता. तुम्ही फारच कनवाळू व मायाळू आहात. कोणालाही दुःखी पाहिले, की तुम्ही लगेच पाघळता. कुटुंबावर, मुलाबाळांवर खूप माया करता. आशा - निराशा, सुख - दुःख, हसू - आसू, यश - अपयश, विजय - पराजय यांची स्पंदने तुमच्या मनात सतत सुरू असतात.

आपण समाजप्रिय आहात. आनंदी व आशावादी आहात. परोपकार वृत्ती, सात्त्विकता, भूतदया, माणूसकी तुमच्यात ओतप्रोत भरलेली असते. आर्थिक

स्थिती सुस्थिर असते. इस्टेट वाढवण्याचा प्रकार तुम्हांला माहीत नाही. तुमचा मित्रपरिवार फार मोठा. तुमच्याविषयी वाईट बोलणारे क्वचितच असतात. लोकांची भांडणे मिटवण्यात तुम्ही पुढाकार घेता. अद्‌भुतरम्य, काल्पनिक दिवास्वप्ने पाहण्याची सवय असल्याने तुम्ही चटकन भोंदू बुवांच्या जाळ्यात अडकता. **भाग्यांक ७** च्या स्त्रिया अत्यंत भावनावश असतात. नाटक - सिनेमा कादंबरीतील पात्रांचे दुःख पाहूनही यांना रडू येते. दुष्ट पुरुषांच्या मायावी बोलण्याने, त्यांच्या भूलथापांना फसून बळी पडतात व नंतर पश्चात्तापाची पाळी येतो. ७ भाग्यांकाच्या मुलींचा विवाह श्रीमंत घराण्यात होतो. परदेशगमनाची संधी वारंवार येते.

व्यवसाय - कार्यक्षेत्रः- तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

गूढविद्या, संमोहनशास्त्र, जादूगार, जादूचे प्रयोग, योगाभ्यास, ज्योतिषशास्त्र, हस्तसामुद्रिकशास्त्र, मंत्रतंत्रशास्त्र, संख्याशास्त्र, कोणतेही संशोधन, मानसोपचारतज्ज्ञ, राजकारण, समाजकारण, फोटोग्राफर, इलेक्ट्रिसिटी व संख्याशास्त्राशी संबंधित विभागात नोकरी, वनस्पती-औषधी, हवामानखाते, टायपिस्ट, कॉम्प्युटर प्रोग्रॅमर, इंजिनिअर, रहस्यकथा लेखक, चित्रपट, दूरदर्शन, नाटक यामधील कलावंत, हॉस्पिटलमधील नर्स, सिस्टर, दवाखान्यांशी संबंधित धंदे, कवी.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयात २५ व्या वर्षी तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही तुमचे कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घराच्या भिंतीचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे, इत्यादीसाठी हिरवा, फिक्कट पिवळा, पांढरा, फिक्कट निळा या रंगाचा वापर केल्यास यशदायक ठरेल. गडद रंग वापरू नयेत.

शुभवार - 'रविवार' व 'सोमवार' हे तुमचे 'शुभवार' आहेत. या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही नवीन किंवा महत्त्वाचे काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे ७, १६, २५ हे दिनांक शुभ आहेत. दिनांक २, ११, २०, २९ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी २१ जून ते २० जुलै आणि २१ जुलै ते २० ऑगस्ट हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे:- वयोवर्षे ७, १६, २५, ३४, ४३, ५२, ६१, ७० ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे २, ११, २०, २९, ३८, ४७, ५६, ६५ ही वर्षे मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे ९, १८, २७, ३६, ४५, ५४, ६३, ७० ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्र- प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी:- ज्या स्त्री- पुरुषांचे भाग्यांक २, ७ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार व भागीदारी केल्यास तुम्हांला हर्ष, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यदायक रत्न - 'मोती' व 'लसण्या' (कॅटस् आय) ही तुमची भाग्यकारक रत्ने आहेत. यांपैकी कोणतेही रत्न करंगळीत वापरावे. ज्या सोमवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या सोमवारी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत 'मोती' (बिनछिद्राचा) 'ॐ सों सोमाय नमः' हा मंत्र १०८ वेळा म्हणून अभिषेक - पूजा करून करंगळीत वापरावा. 'मोती' सोने किंवा चांदीच्या अंगठीत बसवून घ्यावा.

'लसण्या' वापरायचा असेल तर पंचधातूच्या अंगठीत बसवून घ्यावा व करंगळीत वापरावा. वापरण्यापूर्वी **'ॐ कें केतने नमः'** या मंत्राने अभिषेक पूजा करून वापरावा.

भाग्यकारक यंत्र

७	२	९
८	६	४
३	१०	५

या चंद्र यंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकांची बेरीज कशीही केली तर १८ च येते.

ज्या सोमवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या दिवशी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत भूर्जपत्रावर किंवा पांढऱ्या जाड कागदावर कापूर मिश्रित पांढऱ्या चंदनाच्या शाईत तुळशीच्या लेखणीने **'ॐ सों सोमाय नमः'** हे यंत्र सोबतच्या आकृतीत दाखवलेल्या ठिकाणी ७ अंक लिहावा. नंतर षोडशोपचाराने ह्या यंत्राची पूजा करून त्या यंत्राची स्थापना देवघरात किंवा इतरत्र सुरक्षित ठिकाणी करून नित्य पूजा करावी. हे यंत्र तुमचे मन स्थिर करून तुमच्या सौभाग्य, ज्ञान व संपत्तीत निश्चित वाढ करील.

उपासना - नृसिंहाचा फोटो किंवा लहानशी चांदीच्या मूर्तीची देवघरात प्राण - प्रतिष्ठा करून स्थापना करावी. रोज या फोटोची किंवा मूर्तीची पूजा अर्चा करून दर्शन घ्यावे. मंगळवारचा उपवास करावा.

ॐ उग्रवीरं महाविष्णुं ज्वलन्त सर्वतोमुखम् ।

हे तुमचे आणखी अवगुण आहेत.

ज्योतिष व गूढविद्येची तुम्हांला आवड आहे; पण ढोंगीपणाची - बुवाबाजीची, उथळ व वरवरच्या पोकळ पांडित्याची चीड आहे. कोणत्याही गोष्टींचे अज्ञान तुम्हांला नसते. कोणताही विषय तुम्हांला अगम्य नसतो. जो विषय घ्याल त्यात प्राविण्य मिळवाल. उलथापालथ, क्रांती, दुराग्रह,लहरीपणा या गोष्टींचे तुम्ही जणू निर्मातेच आहात.

व्यवसाय - कार्यक्षेत्र:- तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

पोलिसखाते, गुप्तहेरखाते, लष्करातील सैन्य विभाग, हवाईसैनिक, शस्त्र, अस्त्र बनवण्याचा कारखाना, डॉकयार्ड, धार्मिक संस्था, अनाथाश्रम, पोलाद, लोखंड, रसायन, प्लॅस्टिक मोल्डींगचा कारखाना, केमिस्ट, ड्रगिस्ट, इंजिनिअर, बँकेत किंवा खाजगी नोकरीत कॅशियर, दलाल, बँकर्स, तेलाचा घाणा चालवणे किंवा ऑईल मिल चालवणे, फौंड्री, किराणा दुकान, खनिज वस्तूंचा व्यापार, कोळसा - जळाऊ लाकडाची वखार, सार्वजनिक क्षेत्रातील मोठमोठे कारखाने, डॉक्टर, ज्योतिषी, गूढविद्या पारंगत, न्यायखाते, न्यायाधीश, वकील, कोर्टातील कारकून, ग्रामपंचायतीचे सरपंच, पुढारी, राजकारणी, आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, पंतप्रधान.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयाच्या **३३** ते **३६** व्या वर्षी तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही तुमचे कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घराच्या भिंतींचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे यासाठी करडा (स्लेटी कलर), काळा, निळा, जांभळा या रंगाचा वापर केल्यास तुम्हांला यशदायक ठरेल.

शुभवार - **'शनिवार'** व **'सोमवार'** हे तुमचे **'शुभवार'** आहेत. या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही नवीन किंवा महत्त्वाचे काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे ८, १७, २६ हे दिनांक शुभ आहेत. दिनांक ४, १३, २२, ३१ हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी **२१ डिसेंबर ते २० जानेवारी** आणि **२१ जानेवारी ते १९ फेब्रुवारी** हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे. नवे कार्य, नवा उद्योग, नवीन योजना या शुभ काळात सुरू करा.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे:- वयोवर्षे ८, १७, ३५, ४४, ५३, ६२, ७१, ८० ही तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे ४, १३, २२ ही वर्षे आजमावून पहावीत. ही वर्षे तुम्हांला चांगली गेली तर वयोवर्षे **३१, ४०, ४९, ५८** व **६७** ही चांगली जातील.

वयोवर्षे ९, १८, २७, ३६, ४५, ५४४, ६७, ७२ ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री - प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी:- ज्या स्त्री- पुरुषांचे भाग्यांक ८, ५, ६ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार व भागीदारी केल्यास यश, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यकारक रत्न - 'नीलम' किंवा **'सफायर'** ही तुमची भाग्यकारक रत्ने आहेत. यांपैकी कोणतेही रत्न पंचधातूच्या अंगठीत बसवून घ्यावे व ही अंगठी मधल्या बोटात वापरावी. ज्या शनिवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या शनिवारी सूर्योदयापासून एका तासाच्या अवधीत **'ॐशनैश्चराय नमः'** या मंत्राने अभिषेक पूजा करून अंगठी वापरण्यास सुरुवात करावी.

भाग्यकारक यंत्र

१२	७	१४
१३	११	९
८	१५	१०

या शनि मंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकाची बेरीज कशीही केली तरी ३३ च येते.

ज्या शनिवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या शनिवारी सूर्योदयापासून एका तासाच्या अवधीत चौकोनी लोखंडी पत्र्यावर किंवा निळ्या जाड कागदावर काळ्या शाईने हे यंत्र लिहावे. सर्व प्रथम आकृतीत दाखवलेल्या ठिकाणी ८ हा अंक लिहावा. यंत्र लिहिताना **'ॐ शनैश्चराय नमः'** हा मंत्र म्हणावा. नंतर या मंत्राची पूजा करून देवघरात स्थापना करावी. हे यंत्र तुमच्या सर्व कार्यात यश देईल.

उपासना - 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र १०८ वेळा म्हणावा. नित्य मारुतीरायाचे दर्शन घ्यावे. **'पंचमुखी हनुमानकवच'** रोज वाचावे. मंगळवारी व शनिवारी मारुतीला काळे उडीद व खडे मीठ वाहावे. **'ॐ पवन पुत्राय नमः'** या सोप्या मंत्राचा जास्तीत जास्त जप करावा.

ज्योतिष- गूढविद्या- अध्यात्म- संतमाहात्म्य
योगविद्या व चिकित्सा
इ. विषयांवरील संग्राह्य ग्रंथांसाठी
आमची **'ग्रंथसूची'** मागवा ! **'विनामूल्य'** पाठवू !

भाग्यांक

९

भाग्यांक ९ हा मंगळाच्या अंमलाखाली येतो. म्हणजेच ९ भाग्यांकाचा स्वामी ग्रह मंगळ आहे. मंगळाच्या राशी आहेत मेष व वृश्चिक. या दोन्ही राशींचा सत्ताधीश अंक ९ आहे.

स्वभाव व गुणदोषः- धैर्य, आत्मविश्वास, दुर्दम्य इच्छाशक्ती, असाधारण चिकाटी, मूर्तिमंत चैतन्य, उसळणारे यौवन, ओसंडून जाणारा उत्साह, मनोनिग्रह, निश्चयात्मकता, एकाग्रता, सातत्य, चिकाटी, आत्मसंयमन, विवेक, आत्मबल, मनोबल कोणतेही कार्य पूर्ण करण्यासाठी लागणारा वकूब या सर्व गोष्टींचे संमेलनच जणू तुमच्या ठायी भरलेले आहे. घरात, कार्यालयात, संस्थेत सर्व लोकांनी आपल्याच तंत्राने वागावे अशी आपली जबर इच्छा असते. रंगेलपणा, रगेलपणा, निश्चय, बेरडपणा याबरोबरच हडेलप्पीपणाही तुमच्यात आहे. संकटात डगमगणे, गांगरणे, भिणे तुम्हांला माहीतच नाही. कोणतेही क्षेत्र असो त्यात धडक मारून पुढे जाण्याची वृत्ती आहे. एखाद्या माणसावर डुख धरून त्याला भुईसपाट केल्याशिवाय तुम्हांला चैन पडणार नाही. कोणाला काही देताना हातचे न राखता देणे हाही तुमचा स्वभाव आहे. तुम्ही तुमच्या मित्रांवर मनापासून प्रेम करता.

संतापीपणा, उधळेपणा, उतावळेपणा, मत्सरी वृत्ती, बेपर्वा वृत्ती, कठोर बोलणे -वागणे हे दोषही तुमच्यात आहेत. तुम्हांला शत्रु फार असतात.

तुमच्या कौटुंबिक जीवनात कलह असतो. हा कलह प्रामुख्याने पत्नीच्या माहेरकडील माणसांशी असतो.

तुम्ही काहीसे असहिष्णु आहात. तुमच्या विरुद्ध बोललेले तुम्हांला सहन होत नाही. घरातील सर्वांनी तुम्हांलाच मोठेपणा द्यावा अशी तुमची अपेक्षा असते. आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे काही वेळा स्वतःवर संकट ओढवून घेता.

आपल्या प्रेयसीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची तुमची तयारी असते. एखादी स्त्री तुम्हांला आपल्या प्रेमपाशात अडकवून चांगलीच मूर्ख बनवेल.

व्यवसाय - कार्यक्षेत्र- तुम्ही खालीलपैकी व्यवसाय किंवा कार्यक्षेत्र निवडले तर तुम्हांला यशस्वी जीवन जगता येईल.

पॅथॉलॉजिस्ट, दंतवैद्य, दवाखाना, सुतिकागृह, हॉस्पिटल, सर्जन, ॲनेस्थिशियन (भूल देणारे), गुप्तहेर, डिटेक्टिव्ह एजन्सी, गुप्त पोलिस, गाईड (वाटाड्या), दुभाषा, टिंबर मर्चन्ट, खाटिकखाना, जादूविद्या, गूढविद्या, ज्योतिषशास्त्र, मंत्र तंत्र, राजकारण, कवी, गायक, नट नटी, संगीत दिग्दर्शक संस्थाचालक, चार चाकी वाहनांचे उत्पादक, सराफी दुकान, रेडिओ दुरुस्ती, व विक्री, फौंड्री खाते, गणिती, इलेक्ट्रिकसंबंधी व्यवसाय.

भाग्योदयास प्रारंभ - तुमच्या वयाच्या २७ व्या वर्षी तुमच्या भाग्योदयास प्रारंभ होतो.

यशदायक रंग - तुम्ही तुमचे कपडे, पेन - बॉलपेनची शाई, घरातली भिंतीचा रंग, फर्निचरचा रंग, घरातील पडदे, यासाठी गुलाबी व तांबड्या रंगाचा वापर केल्यास यशदायक ठरेल.

शुभवार - 'मंगळवार', 'गुरूवार', 'शुक्रवार' हे तुमचे **'शुभवार'** आहेत.

या शुभवारी तुमचे शुभदिनांक आले तर हे वार अधिक शुभ ठरतील. कोणतेही नवीन किंवा महत्त्वाचे काम या दिवशी करावे.

शुभदिनांक - कोणत्याही महिन्याचे ९, १८, २७ हे दिनांक शुभ आहेत. दिनांक ३, ६, १५, २१, २४, ३० हे मध्यम शुभ आहेत. बाकीचे दिनांक अनिष्ट आहेत.

शुभकाळ - दरवर्षी **२१ मार्च ते २७ एप्रिल** आणि **२१ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर** हा काळ तुम्हांला सर्व दृष्टीने शुभ आहे. नवे कार्य, नवा उद्योग, नवीन योजना या शुभकाळात सुरु करा.

भाग्यकारक व मारक वयोवर्षे- वयोवर्षे ९, १८, २७, ३६, ४५, ६३, ७२ ही वर्षे तुमची भाग्यकारक वर्षे होत.

वयोवर्षे १, १०, १९, २८, ३७, ४६, ५५, ६४, ७३ ही वर्षे मध्यम यश देणारी ठरतील.

वयोवर्षे ८, १७, २६, ३५, ४४, ५३, ६२, ७१ ही वर्षे तुम्हांला मारक ठरतील.

मैत्री - प्रेमसंबंध - विवाह - व्यापार - भागीदारी- ज्या स्त्री- पुरुषांचे भाग्यांक ३, ६, ९ यांपैकी असतील त्यांच्याशी मैत्री, प्रेमसंबंध, विवाह, व्यापार व भागीदारी केल्यास यश, आनंद व समाधान मिळेल.

भाग्यकारक रत्न - **'पोवळे'** हे तुमचे भाग्यकारक रत्न आहे. सोने किंवा तांब्यात पोवळ्याची अंगठी करून घ्यावी. अंगठ्यापासून चौथ्या बोटात (करंगळीच्या शेजारच्या बोटात) धारण करावी. ज्या मंगळवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या मंगळवारी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत '**ॐ अं अंगारकाय नमः**' या मंत्राने अभिषेक पूजा करून अंगठी वापरण्यास सुरुवात करावी.

भाग्यकारक यंत्र

८	३	१०
९	७	५
४	११	६

या मंगळ यंत्राची पूजा - उपासना तुमच्या भाग्योदयाला विशेष सहाय्यक ठरेल. या यंत्राची रचनाच अशी केलेली आहे, की यातील अंकांची बेरीज २१ च येते.

ज्या मंगळवारी तुमचा शुभदिनांक येईल त्या मंगळवारी सकाळी सूर्योदयापासून एक तासाच्या अवधीत चौकोनी भूर्जपत्रावर किंवा पांढऱ्या जाड कागदावर लाल चंदनाच्या किंवा शेंदुराच्या शाईत डाळिंबाच्या लेखणीने हे यंत्र लिहावे. सर्वप्रथम आकृतीत दाखविलेल्या ठिकाणी ९ अंक लिहावा. यंत्र लिहिताना '**ॐ अं अंगारकाय नमः**' हा मंत्र सतत म्हणावा. नंतर या यंत्राची पूजा करून त्याची देवघरात स्थापना करावी. हे यंत्र तुम्हांला सतत उत्साही ठेवून कार्यात यश देईल.

उपासना - '**ॐ गं गणपतये नमः**' या नवाक्षरी मंत्राचा जप करावा. गणपती अथर्वशीर्ष रोज एकवेळ म्हणावे. संकष्टी चतुर्थी व मंगळवारचा उपवास करावा. '**ॐ अंजनी जाताय विद्महे वायपुत्राय धीमहि। तन्नो हनुमान प्रचोदयात् ॥**' हा हनुमान गायत्रीचा रोज कमीत कमी १०८ वेळा जप करावा. मारुतीरायाचे व गणपतीचे दर्शन घ्यावे.

■ ■ ■

आमची ज्योतिषविषयक प्रकाशने

■ राशी भविष्य मार्गदर्शन	...	रु.	५०
■ राशी, रत्ने आणि आराध्यवृक्ष	...	रु.	२७
■ ग्रहपीडा निवारण	...	रु.	२५
■ अनिष्ट ग्रहपीडा निवारक साधना	...	रु.	७५
■ तुमचे भविष्य, तुम्हीच पाहा !	...	रु.	४५
■ तुमची कुंडली तुम्हीच पाहा !	...	रु.	१२५
■ तुमचे भाग्यरत्न	...	रु.	७५
■ रत्नांची दुनिया	...	रु.	४०
■ साडेसाती : शोध व बोध	...	रु.	४०
■ साडेसाती आणि प्रभावी दैवी उपाय	...	रु.	२५
■ साडेसातीतून सुटका	...	रु.	२५
■ तुमचा भाग्यांक... तुमचे भविष्य !	...	रु.	२५
■ तुमचा प्रश्न... तुम्हीच पाहा !	...	रु.	२५
■ संतान योग : शोध व बोध	...	रु.	७०
■ तुमच्या नशिबात संततीसौख्य आहे का ?	...	रु.	४०
■ पंचांग असे पहावे !	...	रु.	४०
■ तुमचे १०८ प्रश्न आणि त्यांची अचूक उत्तरे	...	रु.	२५
■ बारा राशी... बारा क्षार	...	रु.	२५
■ विवाहयोग : अचूक कालनिर्णय	...	रु.	१००
■ रमल प्रवेश	...	रु.	२५
■ सुलभ वास्तुविचार	...	रु.	३५
■ त्रिपिंडी, नारायण नागबली, कालसर्पयोग	...	रु.	२०

संपर्क

अंजली पब्लिशिंग हाऊस

'सप्तशृंगी', १५११ सदाशिव पेठ, टि.स्मा.मंदिर ते पेरुगेट रस्ता, पुणे ३०

दूरभाष : (का.) ४४८ ५०९१, (नि.) ४४८ ९२८७, (गो.) ४४७ ११२५